## * ऋण निर्देश *

प्रस्तुत शोध निबंध तयार करीत असताना ज्या अनेक व्यक्तिंची व संस्थांची मदत झाली. त्या सर्वांचे आभार प्रदर्शित करणे माझे कर्तव्य आहे.

सर्व-प्रथम माझ्या मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीमती एल. के. कुलकर्णी यांची मी कृतज्ञ आहे. कारण संपूर्ण शोध निबंध पूर्ण करेपर्यंत त्यांनी नेहेमीच उत्साहाने व उत्तेजन देऊन मोलाचे मार्गदर्शन केले व आवश्यक ते सर्व सहकार्य केले. अभ्यासाचा, संशोधनाचा नवा दृष्टिकोन दिला. त्यांचे ऋण थोडक्या शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. परन्तु त्यांनी केलेल्या अनुभवी व अभ्यासपूर्ण मार्गदर्शनाच्या आधारे हा शोध निबंध सादर करणे माझ्यासाठी हर्षदायक गोष्ट आहे.

त्याचबरोबर डी. बी. एफ. दयानंद, कला व शास्त्र, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्री. झुंजुरवाड, याच महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र शाखेचे विभाग प्रमुख प्रा. गोडबोले सर, दयानंद महाविद्यालयाच्या लायब्ररी मधील स्टाफ यांनी नेहमीच उत्साहाने दिलेल्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

शोध निबंधासाठी माहिती मिळवित असताना अनेकांचे सहाय्य लाभले. तेलुगु समाजातील मान्यवर नेते, पद्मशाली शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, सोलापूर जिल्हा औद्यो. सह. बँक, सोलापूर नागरी औद्यो. सह. बँक, मर्चंट्स बँक, सोलापूर व यशवंत सूतगिरण्यांचे पदाधिकारी, पश्चिम महाराष्ट्र मध्यवर्ती विणकर मंडळ, यंत्रमाग फेडरेशन, पद्मशाली शिक्षण संस्थेची लायब्ररी, हिराचंद नेमचंद जनरल वाचनालय, सोलापूर महाविद्यालय लायब्ररी, महानगरपालिका, पक्ष कार्यालये अशा सर्व संस्थांच्या पदाधिका-यांनी संपूर्ण सहकार्य केले त्यांचे सहकार्य नेहमीच स्मरणात राहिल.

तेलुगु समाजातील एक मान्यवर, अनुभवी व आदरणीय व्यक्ति, कॉंग्रेसचे क्रीयाशील कार्यकर्ते कै. श्री. आशण्णा इराबत्ती यांचेप्रति मी कृतज्ञता व्यक्त करते. कारण त्यांनी लिहीलेल्या "माझ्या आयुष्यातील टिपणे " या आत्मचरित्रपर ग्रंथाचा व त्यांनी केलेल्या मुल्यवान कात्रणांच्या संग्रहाचा शोध निबंध लिहीताना अतिशय उपयोग झाला. ते साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचेही आभार.

सोलापूरमधील भा. ज. प. चे नगरसेवक श्री. जगदीश तुळजापूरकर यांनी स्वत: बरोबर येऊन व आपला वेळ खर्च करून तेलुगु नेत्यांशी संपर्क साधून दिला. तसेच दयानंद महाविद्यालयातील श्री. एन्. आर. देशपांडे यांनी आपल्या कामाच्या व्यापातून वेळ काढून सर्व तांत्रिक अडचणी सोडविण्यात अनुभवी सहाय्य केले. दोघांनी केलेल्या या सहकार्यामुळे शोध निबंधाच्या कामास गति आली.

गेली २८-२९ वर्षे तेलुगु समाजात वैद्यकीय व्यवसाय करीत असलेले माझे वडील, सुप्रसिध्द डॉ. वि. गं. परिचारक यांनी सतत मला वेळोवेळी उत्तेजन दिले. आपल्या अनुभवाच्या व लोकसंपर्काच्या आधारे तेलुगु समाजाबद्दल निरनिराळ्या प्रकारे माहिती दिली. जमविलेल्या माहितीवर चर्चा केली व सर्व प्रकारे सहाय्य केले. त्यांचे आभार मानणे औपचारिकपणाचे होईल परन्तु त्यांची मी निश्चितच ऋणी आहे.

नोव्हेंबर - १९९० कु. मेधा वि. परिचारक.